# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेत अग्निशमन व आपत्कालीन विभागाअंतर्गत **{सा.प्र.वि.}** कार्यरत ११ अग्निशमन केंद्रा प्रमाणे ३७ अग्निशमन विमोचक कार्यरत असुन विभागातील कर्मचाऱ्यांची कमतरता लक्षात घेता पावसाळयात होणा-या अतिवृष्टी व नैसर्गिक आपत्तीमुळे होणारी जिवीत व वित्तीय हानी टाळण्यासाठी मान्सुन पूर्व तयारी उपाययोजनेबाबत झालेल्या सभेत दिलेल्या निर्देशाप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन कार्याकरीता १०० प्रशीक्षणार्थी (Internship) तत्वावर घेतल्यास ०४ महिन्याकरिता रु. २०,०००/- दरमहा विद्यावेतन द्यावयाचे असल्यामुळे विद्यावेतनावर अंदाजे रु. ८०,०००,०० लाख रुपये खर्च अपेक्षित राहणार आहे. सदर खर्चाची तरतुद अग्निशामक विभागाचे पदशिर्षकांतर्गत करण्यात येईल.

करिता प्रशीक्षणार्थी (Internship) तत्वावर अग्निशामक विमोचकांची एकमुस्त विद्यावेतन रु. २०,०००/- प्रमाणे १०० पदे भरण्याच्या विषयाचा प्रस्तावाला मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक** :- 127/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 16/06/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त (साप्रवि), सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेत अग्निशमन व आपत्कालीन विभागाअंतर्गत कार्यरत ११ अग्निशमन केंद्रा प्रमाणे ३७ अग्निशमन विमोचक कार्यरत असुन विभागातील कर्मचाऱ्यांची कमतरता लक्षात घेता पावसाळयात होणा-या अतिवृष्टी व नैसर्गिक आपत्तीमुळे होणारी जिवीत व वित्तीय हानी टाळण्यासाठी मान्सुन पूर्व तयारी उपाययोजनेबाबत झालेल्या सभेत दिलेल्या निर्देशाप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन कार्याकरीता १०० प्रशीक्षणार्थी (Internship) तत्वावर घेतल्यास ०४ महिन्याकरिता रु. २०,०००/- दरमहा विद्यावेतन द्यावयाचे असल्यामुळे विद्यावेतनावर अंदाजे रु. ८०,०००,०० लाख रुपये खर्च अपेक्षित राहणार आहे. सदर खर्चाची तरतुद अग्निशामक विभागाचे पदशिर्षकांतर्गत करण्यात येईल.

करिता प्रशीक्षणार्थी (Internship) तत्वावर अग्निशामक विमोचकांची एकमुस्त विद्यावेतन रु. २०,०००/- प्रमाणे १०० पदे भरण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.